# अमरावती महानगरपालिका अमरावती
## स्वच्छता विभाग

जा.क्र.:- अमनपा/स्व.वि/685/2026 दिनांक :-26/07/2026

**सूचना / दरपत्रक मागणी (Quotation Notice)**

**विषय :- अमरावती महानगरपालिका हद्दीत साथरोग नियंत्रण कार्यक्रमासाठी Bleaching Powder, Linden Powder, Lime Powder, Malaria Larvicidal Oil (MLO) व Weedicide (तणनाशक) खरेदीकरीता स्थानिक उत्पादक, अधिकृत वितरक, विक्रेते व पुरवठादार यांच्याकडून सीलबंद दरपत्रके (Quotation) मागविणेबाबत.**

अमरावती महानगरपालिका हद्दीत पावसाळ्याच्या पार्श्वभूमीवर डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया व इतर साथीच्या रोगांचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी तसेच सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने प्रतिबंधात्मक उपाययोजना प्रभावीपणे राबविण्यासाठी स्वच्छता विभागामार्फत खालील साहित्याची खरेदी करण्यात येणार आहे.

**आवश्यक साहित्य**

| अ.क्र. | साहित्याचे नाव | तपशील |
|---|---|---|
| 1 | **Bleaching Powder** | Available Chlorine किमान **30%** ते **34%** |
| 2 | **Linden Powder (Gamma BHC)** | शासन मान्य दर्जानुसार |
| 3 | **Lime Powder (Quick Lime / Hydrated Lime)** | औद्योगिक / सार्वजनिक आरोग्य वापरासाठी |
| 4 | **Malaria Larvicidal Oil (MLO)** | शासन मान्य दर्जानुसार |
| 5 | **Weedicide / Herbicide (तणनाशक)** | सार्वजनिक ठिकाणी वापरण्यास योग्य शासन मान्य उत्पादन |

**सदर साहित्याचा उपयोग**

- पाणी साचलेल्या ठिकाणांचे निर्जंतुकीकरण.
- डासांच्या अळ्यांचे (Larvae) नियंत्रण.
- नाले, गटारे व पावसाळी पाण्याच्या वाहिन्यांमध्ये फवारणी.
- कचरा संकलन केंद्रे, ट्रान्सफर स्टेशन व कचरा डेपोचे निर्जंतुकीकरण.
- सार्वजनिक शौचालये व सार्वजनिक मूत्रालये.
- सार्वजनिक ठिकाणे, बाजारपेठ, उद्याने व इतर गर्दीच्या ठिकाणांचे निर्जंतुकीकरण.
- सार्वजनिक जागा, रस्त्याकडील भाग, नाले व मोकळया जागेतील तण नियंत्रण.

**दरपत्रकामध्ये खालील बाबी नमूद करणे आवश्यक राहील :**

1. साहित्याचे नाव, ब्रँड व उत्पादक कंपनीचे नाव.
2. दर्जा (Specification/Quality).
3. संबंधित भारतीय मानक (ISI/BIS) अथवा शासन मान्यताप्राप्त दर्जा.
4. Bleaching Powder मधील Available Chlorine (%) चे प्रमाण.
5. प्रति किलो / प्रति लिटर / प्रति 25 किलो / प्रति 50 किलो / प्रति ड्रम यानुसार दर.
6. GST स्वतंत्र व GST सहित एकूण दर.
7. पुरवठा करण्याचा कालावधी.
8. उपलब्ध साठ्याची माहिती.
9. आवश्यक असल्यास नमुना (Sample) उपलब्ध करून देण्याची तयारी.
10. उत्पादक कंपनीचे **Technical Data Sheet (TDS)**.
11. **Material Safety Data Sheet (MSDS)**.
12. गुणवत्ता प्रमाणपत्र (Quality Certificate / COA).
13. Batch Number, Manufacturing Date व Expiry Date.

Scanned with OKEN Scanner

14. भारत सरकार / महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेले उत्पादन असल्याचा पुरावा.
15. उत्पादक अथवा अधिकृत वितरक असल्याचे प्रमाणपत्र (जर लागू असेल तर).
16. GST नोंदणी प्रमाणपत्र.
17. PAN Card प्रत.
18. अनुभव असल्यास त्याचा तपशील.
19. पुरवठा अटी व देयक अटी.

**महत्वाच्या अटी**

1. सर्व औषधी द्रव्ये, रसायने व साहित्य भारत सरकार अथवा महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेले असणे आवश्यक राहील.
2. महानगरपालिकेस आवश्यकतेनुसार कोणत्याही साहित्याचे प्रमाण कमी-जास्त करण्याचा अधिकार राहील.
3. नमुने व कागदपत्रांची पडताळणी करूनच अंतिम निर्णय घेण्यात येईल.
4. केवळ सर्वात कमी दर (L-1) स्वीकारणे महानगरपालिकेवर बंधनकारक राहणार नाही.
5. महानगरपालिकेस कोणतेही अथवा सर्व दरपत्रके कोणतेही कारण न देता स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा पूर्ण अधिकार राहील.
6. ही सूचना केवळ दरपत्रके मागविण्यासाठी असून यामुळे कोणत्याही पुरवठादारास खरेदी आदेश देण्याचे बंधन महानगरपालिकेवर राहणार नाही.
7. आवश्यक असल्यास महानगरपालिका पुरवठादारास नमुना सादर करण्यास सांगू शकते.

**दरपत्रक सादर करण्याची अंतिम मुदत**

इच्छुक उत्पादक, अधिकृत वितरक, विक्रेते व पुरवठादार यांनी आपले **सीलबंद** दरपत्रक आवश्यक कागदपत्रांसह **दिनांक 29/07/2026 रोजी दुपारी 4.00 वाजेपर्यंत** खालील पत्त्यावर सादर करावे.

**वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता)**
स्वच्छता विभाग,
अमरावती महानगरपालिका, अमरावती.
विहित मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या दरपत्रकांचा विचार करण्यात येणार नाही.

**वैद्यकीय अधिकारी (स्वच्छता)**
**महानगरपालिका, अमरावती**

**प्रतिलिपी :**

1. **मा. आयुक्त, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव.**
2. **मा. अतिरिक्त आयुक्त, अमरावती महानगरपालिका – माहितीस्तव.**
3. **मा. उपायुक्त (स्वच्छता), अमरावती महानगरपालिका – आवश्यक कार्यवाहीस्तव.**
4. **सूचना फलक / मनपा संकेतस्थळ / स्वच्छता विभाग – प्रसिद्धीसाठी.**

Scanned with OKEN Scanner